# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ च्या महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(परीक्षा व मुल्यमापन मंडळ)**

कॉम्प्लेक्स परिसर, एम.आय.डी.सी.रोड, गडचिरोली–४४२६०५

दुरध्वनी क्रमांक:कार्यालय:०७१३२–२२३३२०
Email: director.boee@unigug.ac.in

जा.क्र./गों.वि./प.व.मु.मं/२०५५/२०२६ दि.२३/०६/२०२६

## परिपत्रक

विद्यापीठाशी संलग्नित सर्व परीक्षा केंद्राचे प्राचार्य, मुख्यकेंद्राधिकारी व सहकेंद्राधिकारी यांना सुचित करण्यात येते की, परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांकरीता महाविद्यालयामध्ये खालीलप्रमाणे पायाभुत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

- प्रशस्त व सुरळीत वर्गखोल्या – परीक्षार्थ्यांना योग्य अंतर ठेवुन बसविण्यासाठी पुरेशी जागा असलेले कक्ष वर्गखोल्यामध्ये सुव्यवस्थित पंखे,लाईट ईत्यादी.
- बैठक व्यवस्था – पुरेशा संख्येने बाके,खुर्च्या व लेखनासाठी सोयीस्कर व्यवस्था.
- विज व प्रकाश व्यवस्था – अखंड वीजपुरवठा तसेच पुरेसा प्रकाश
- पिण्याच्या पाण्याची व्यवस्था – स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध असणे.
- स्वच्छतागृह व्यवस्था – मुली व मुलांसाठी स्वतंत्र आणि स्वच्छ स्वच्छतागृहे.
- सुरक्षा व्यवस्था – परीक्षा सुरळीत पार पाडण्यासठी सुरक्षा कर्मचारी व आवश्यक नियंत्रण व्यवस्था.
- सीसीटीव्ही देखरेख – परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी.
- संगणक व इंटरनेट सुविधा – ऑनलाइन किंवा संगणकाधारित परीक्षासांठी आवश्यक उपकरणे व नेटवर्क
- दिव्यांगांसाठी सुविधा – रॅम्प, व्हीलचेअर प्रवेश व इतर आवश्यक सोयी.
- प्राथमिक उपचार सुविधा – आपत्कालीन परिस्थितीसाठी प्रथमोपचार पेटी व वैद्यकीय मदतीची व्यवस्था.
- सुचनाफलक व मार्गदर्शन – परीक्षार्थ्यांना कक्ष व इतर माहिती सहज मिळण्यासाठी स्पष्ट सुचना.
- स्वच्छ व शांत वातावरण – परीक्षेसाठी अनुकुल, शांत आणि स्वच्छ परिसर.

करीता परीक्षा केंद्रामध्ये सर्व पायाभुत सोयी सुविधा उपलब्धतेनुसार प्राचार्य यांनी वरील बाबीची तपासणी योग्य व्यवस्थेमार्फत करून त्याचा अहवाल दिनांक ०५/०७/२०२६ पर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा पुर्व विभागात सादर करावा.

२३/६/२६

(डॉ.नविन मुंगले)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलीपी :–**

१) मा.कुलगुरू महोदयांचे स्विय सहाय्यक,गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.प्र–कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मा.कुलसचिव महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned by Camera Scanner